भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ५०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०७/२०१७

## १) सोण्या चांदीच्या दागिण्याची चोरी.:—

दिनांक ०९/०७/२०१७ चे १८.३०.ते दि. १०/०७/२०१७ चे ०६.३० वा. दर. यातील फिर्यादी सौ. रंजना रविन्द मलेवार वय ५० वर्ष रा. नेहरू वार्ड तुमसर ही घराला ताला लावुन बहीनहचे घरी श्रीराम नगर तुमसर येथे गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचा समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करून आलमारीत ठेवलेली १ सोण्याची एकदानी १५ ग्रॅम १ सोन्याची चपलाकंठी २७ ग्रॅम, सोन्याचे कानातील बारीक साखळया ३ ग्रॅम, सोन्याच्या कानातील रिंग २.५ ग्रॅम, सोन्याचे ३ नथ ५ ग्रॅम, सोन्याचा डोरला मनी २ ग्रॅम, चांदी १२० ग्रॅम, व नगदी २०००/रु असा एकुण ८५२५०/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी उईके पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

## २) उपकेद्र लाखांदुर येथील आयसोलेटर तांब्याचे प्लेट चोरून नेल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १०/०७/२०१७ चे ००.३० ते०१.३० वा. दर.यातील यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने १३२ केव्ही उपकेद्र लाखांदुर येथील २ नग आयसोलेटर प्लेट तांब्याचे कि. ४८००/—रु, १ नग आयसोलेटर ब्लेड तांब्याचे कि. १०००/—रु असा एकुन ५८००/—रु चा माल कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी संजय सहादेव महालगावे वय ४९ वर्ष कार्यकारी अभियंता लाखांदुर यांचे .लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादंवि. सहकल १३६ भा.वी.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. घागी पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

## ३) शुल्लक कारनावरून संगनमत करून कुऱ्हाडीने हातावर व काठीने पाठीवर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १०/०७/२०१७ चे ०८.०० वा. दर .यातील यातील फिर्यादी हेमराज बळीराम कोरडे वय २५ वर्ष रा. देवनारा यांचे घराचे मागील भागात शेतामध्ये गाडलेले फल्लर आरोपीतांनी उपटुन फेकले त्यावरून फिर्यादीने त्यांना 'फल्लर का उपटुन फेकल' असे हटकले असता ही जागा आमची आहे असे म्हणुन संगनमत करून आरोपी क्र. १,२ यांनी कुऱ्हाडीने फिर्यादीचे डाव्या हातावर मारून जखमी केले तसेच आरोपी क्र. ३ याने काठीने पाठीवर मारून जखमी केले व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२६,५०६,५०४,३४ भादंवि. . अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.लिल्लारे पो.स्टे. गोबरवाही . हे करीत आहेत.

४) दारू पिवुन ब्लेड सारख्या धारदार वस्तुने वार करून शिवीगाळ व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १०/०७/२०१७ चे २१०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादी प्रेमदास गोकुळदास गिरडकर वय २५ वर्ष रा. सोमलवाडा बुज. हा जैपाल वैदय यांचे पाण टपरीवर बसला असता आरोपी हा दारू पाणी पिवुन रवी जाभुंळकर याला शिवीगाळ करीत होता व फिर्यादीकडे पाहणु तुझ्या बद्दल मला सर्वकाही माहीत आहे असे बोलुन भांडण करून फिर्यादीचे डावे खादंयावर , मानेजवळ ब्लेड सारख्या धारदार वस्तुने वार करून शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५)अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०७/०७/२०१७ चे २३.५० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवीयीन मुलगी हीला यातील आरोपने फिर्यादीचे ताब्यातील रखवालीतुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) काठीने डोक्यावर , हातावर मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १०/०७/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील फिर्यादी बाबुलाल लालाजी खंडारे वय ७२ वर्ष रा. शिवाजी वार्ड साकोली हा व आरोपीचे घर एकमेकांचे शेजारी असुन यातील फिर्यादीने आरोपीस घरासमोरील खुल्या जागेत काडी कचरा कशाला फेकला असे हटकले असता आरोपीने भांडण ,शिवीगाळ करून फिर्यादीचे डाव्या हातावर काठी मारल्यानंतर फिर्यादीची पत्नी सौ. लिलाबाई वय ६० वर्ष ही भांडण सोडविण्यास गेली असता आरोपीने तिचे डोक्यावर काठी मारून आपखुशीने दुखापत करून जखमी केल्याने व जिवाने मरण्याची धमकी दिल्यने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत

७) सेंट्रीगच्या लागडी पाटीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०९/०७/२०१७ चे ६८.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. निशा भोंडेकर वय ३२ वर्ष रा.आंबेडकरवार्ड भंडारा ही व आरोपी पती पत्नी असुन आरोपीने फिर्यादीला पैसे देण्यास नकार दिल्याने भांडण करून आरोपीने सेंट्रीगच्या लाकडी पाठीने तिचे डोक्याचे डावे बाजुला मारून जखमी करून शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

## ८) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक १०/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे साकोली, अडयाळ व दिघोरी येथे अवैध दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४५० मिली लिटर देशी दारु कि.१५००/–रु. व जुगारातुन किमती. ३००/रु. असा एकुण किमती ४५० /रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.